# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पथकाकडुन ट्रान्सपोर्टच्या नावाखाली खंडणी उकळणा-या आरोपीस अटक, मुद्देमाल हस्तगत.

इसम नामे राजेश नायक, रा. कोथरूड, पुणे हे कामानिमित्त पुणे येथुन मॅंगलोर येथे शिफ्ट झाल्याने, त्यांनी त्यांचे घरसामान व दुचाकी मोपेड क्रमांक एम एच १२ एल एल २७२० हे कोथरूड येथुन मॅंगलोर याठिकाणी पोहोच करण्यासाठी दि. १९/११/२०२० रोजी www.vrlcargoindiapacker.in या वेबसाइट वरुन प्राप्त झालेला सोनु चौधरी याचा मोबाईल क्रमांक ९५९५६७७००१ यावर संपर्क केला असता, सदर इसमाने पीडीत राजेश नायक यांना त्याचे नाव सोनु चौधरी असे असुन, त्याची स्वतःची **VRL CARGO INDIA PACKER** नावाची निगडी येथे ट्रान्सपोर्ट कंपनी असल्याचे सांगुन राजेश नायक यांचे सामान पुणे येथुन मॅंगलोर येथे पोहच करणे बाबत ११,०००/-रुपये असे भाडे ठरविले. सदर व्यवहारा पोटी सोनु चौधरी याने त्याचे मित्राचा मो.क्र. ९०२४६१४०१४ यावर पेटीएम द्वारे ८,०००/- रू रक्कम स्विकारले. त्यानंतर सोनु चौधरी याने दिनांक २४/११/२०२० रोजी राजेश नायक याचे घरातील कि.रू. १,६०,०००/- रू चे सामान कोथरूड येथुन घेवुन, सदरचे सामान मॅंगलोर येथे पोहोच न करता, राजेश नायक यांना फोन करून, सामान पाहिजे असल्यास ठरलेल्या रक्कमेपेक्षा आणखीन ९,०००/- रू अतिरिक्त रक्कमेची सतत मागणी करून, धमकी देवुन, घरसामान पोहच केले नाही म्हणुन राजेश नायक यांची फसवणुक करून, विश्वासघात केले बाबत राजेश नायक यांचे वतीने त्यांचे मित्र आशिष शिवाजीराव गावडे, वय ४३ वर्षे, रा. शाहु कॉलनी, कर्वेनगर, पुणे यांनी तक्रार दिल्याने त्याबाबत निगडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ४५६/२०२० भादवि कलम ४१९, ४२०, ४०६, ३८४, ५०६, ३४ प्रमाणे दिनांक ०४/१२/२०२० रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयातील आरोपी याने **VRL CARGO** या नामांकीत कंपनीचे नावाचा वापर करुन, अनेक लोकांची फसवणुक करुन खंडणी उकळली असल्याने व सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो, पिंपरी चिंचवड यांचे आदेशान्वये गुन्हयाचा पुढील तपास खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा यांचेकडे दिनांक १०/१२/२०२० रोजी वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी सोनु चौधरी याने फिर्यादी यांचे मित्राचे घरसामान व इतर दुचाकी मोपेड ज्या टेम्पोंमधुन घेवुन गेला त्या टेम्पोंच्या क्रमांक घटनास्थळा जवळील सीसीटीव्ही फुटेज मध्ये मिळुन आला त्याबाबत आरटीओ विभागाकडुन माहिती प्राप्त करुन, तसेच तांत्रिक विश्र्लेषन व फेसबुक माध्यमाचा वापर करुन, सदरचा टेंम्पो हा शिवराज ट्रान्सपोर्ट निगडी येथे असल्याची माहिती मिळाली. खंडणी पथका मधील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन एक दिवस पाळत ठेवुन, सदर टेम्पो चालकास ताब्यात घेवुन, त्याचेकडे आरोपी सोनु चौधरी बाबत सखोल चौकशी केली असता, त्याने सोनु चौधरी याचेकडुन शिवराज ट्रान्सपोर्ट तर्फे कोथरुड येथुन निगडी येथे घरसामान घेवुन जाणेबाबत मिळालेल्या भाडे प्रमाणे सदरचे सामान निगडी ट्रान्सपोर्टनगर येथे गोडावुन मध्ये पोहचविले असल्याचे सांगितले. सदर मिळालेल्या माहिती वरुन

आरोपी सोनु चौधरी याचा कोथरुड, निगडी व पिंपरी चिंचवड परिसरात शोध घेत असताना आरोपी सोनु चौधरी हा वापरत असलेला मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याबाबत तांत्रिक तपास करुन व गोपनीय बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीचे आधारे सोनु चौधरी यास निगडी ट्रान्सपोर्ट नगर या परिसरातुन ताब्यात घेवुन विचारपुस करता, त्याचे **खरे नांव विरेंद्रकुमार रामकिशन पुनिया** वय २५ वर्षे रा. ट्रान्सपोर्टनगरी, निगडी, पुणे मुळगाव :-गाव सरदारपुर, पो. हमिरवास, तहसिल राजगड, जि. चुरू, थाना हमिरवास, राज्य राजस्थान असे त्याचे पॅनकार्ड व आधारकार्डवर मिळुन आले. त्यास सदर गुन्हयाचेकामी **दिनांक १०/११/२०२० रोजी १९:०० वा. अटक करुन, त्याची दिनांक १४/११/२०२० रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली आहे.**

नमुद आरोपीताकडे दाखल गुन्हयाबाबत अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली देवुन, आपली ओळख लपविण्याकरीता सोनु चौधरी या खोटया नावाचा वापर करुन व **VRL CARGO INDIA PACKER** या नावाची खोटी कंपनी व वेबसाईट तयार केली असुन, सदरची कंपनी हि कोठेही रजिस्टर नसल्याचे आढळुन आले आहे. सोनु चौधरी याने खोटया तयार केलेल्या वेबसाईटवर **सोनु चौधरी, सोनु कुमार, विक्रम सिंग असे वेगवेगळे नावे व मोबाईल क्रमांक दिले होते.** सदर वेबसाईट अथवा मोबाईल क्रमांकवर संपर्क साधलेल्या लोकाशी सोनु चौधरी/सोनु कुमार/विक्रम सिंग हा गोड बोलुन त्यांचा विश्वास संपादन करुन आणि आकर्षक आश्वासने देवुन भाडे स्विकारुन, त्यांची फसवणुक करुन, खंडणीच्या स्वरुपात जादा पैसे उकळल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी विरेंद्रकुमार पुनिया याचे कडुन त्याने सदर गुन्हयातील वापरलेला कि.रू. १०,०००/- चा एक व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन तसेच निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथील गोडऊन मधुन फिर्यादीचे १,६०,०००/-रुपये किंमतीचे घरगुती सामान व मोपेड गाडी नंबर एम.एच.१२/एल.एल/२७२० जप्त करण्यात आले आहे. आरोपीने आणखीण अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत काय याबाबत तपास चालु आहे.

**जनतेने सर्तकता बाळगणे बाबत आवाहन :-**

**१) नागरीकांनी सोशल मिडीयाद्वारे संपर्क साधलेली ट्रान्सपोर्टचे रजिस्ट्रेशन आहे काय याची खात्री करावी.**

**२) दिलेल्या पत्त्यावर सदरची कंपनी अथवा कंपनीचे कार्यालय आहे अगर कसे याची खात्री करावी.**

**३) घरसामान नेण्यासाठी आलेले वाहनाचा आरटीओ क्रमांक, वाहनाचे कागदपत्रे, वाहन चालकाचे नाव व पत्ता, त्याचा फोटो मोबाईल क्रमांक, लायसन्स,आधारकार्ड व पॅनकार्ड इत्यादी कागदपत्राचे मोबाईलद्वारे फोटो अथवा झेरॉक्सप्रत घ्यावी.**

**४) इंटरनेटवर सदर कंपनीची सर्व्हिस बाबत पुनरावलोकन** (Review) **कसा आहे याबाबत खात्री करावी.इत्यादी**

**५) नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, अशा पध्दतीने कोणा बरोबर फसवणुकीचे अथवा खंडणी उकळण्याचे प्रकार झाले असल्यास त्यांनी मोबाईल क्रमांक ८६६९११९५५३, ८६०५०५५२५५ यावर संपर्क करावा अथवा जवळच्या पोलीस स्टेशनला तक्रार दयावी.**

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड शहराचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश सा़ो, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे सा़ो, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ सा़ो, सहा.पोलीस आयुक्त, श्रीमती प्रेरणा कट्टे मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे, सहा.पोलीस निरीक्षक अनिल लोहार, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार महेश खांडे, राजेंद्र शिंदे, उमेश पुलगम, राहुल खारगे, विक्रांत गायकवाड, प्रविण कांबळे, नितिन लोखंडे, गणेश कोकणे, प्रविण माने, नागेश माळी व अतुल लोखंडे तांत्रिक विश्षेलण शाखा यांचे पथकाने केली आहे.

(उत्तम तांगडे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खंडणी विरोधी पथक,
गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड